IMPACT FACTOR 5.473(SJIF)
**UPA NATIONAL E-JOURNAL**
*Interdisciplinary Peer-Reviewed Journal*
ISSN 2455-4375

# चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या कृषी विषयक योजना

संशोधक विद्यार्थी
**हरिष एम. बावनगडे**
bawangadeharish@gmail.com

---

**प्रस्तावना –**

१९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर स्वतंत्र्य भारताने २६ जानेवारी १९५० साली नविन राज्य घटना कार्यवहित आणली सर्व भारतीय नागरिकांना यात समाविष्ठ करण्यात आले. पण आदिवासींचे जीवन अधिक दुर्बल व असह्य असल्याने त्यांच्यासाठी काही विशेष तरतुदींची आवश्यकता होती. भारतीय संविधानात समता आणि न्यायाचे तत्व मान्य करून जाती व्यवस्थेच्या आधारावर निर्माण झालेली विषमता दूर करणे तसेच अनुसुचित जमातीचा विकास करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या.

विशेष म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) नुसार व अधिनियमातील ५ (१) व १९ नुसार विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांच्या कृषी विकासात कशा प्रकारे वाढ करता येईल. यावर जास्तीत जास्त भर देण्यात आला.

**आदिवासी विभागाची प्रशासकीय यंत्रणा**




एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या विशित्य गरजा लक्षात घेऊन आदिवासी उपयोजना तयार करण्यात आली आहे. तथापी प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक गरजा हया शासनाने मान्य केलेल्या

नियमित योजनाहून भिन्न असतात आणि त्यामुळे त्यांना नियमित आदिवासी उपयोजनेत निधी उपलब्ध करण्यासाठी 'रूक्लिअस बजेट' नावाची योजना १९८१–८२ पासून राबविण्यात येत आहे या योजनेच्या अंतर्गत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना योजना तयार करण्याचे तसेच त्यांची अंमलबजावणी किंवा इतर विभागाच्या स्थानिक दृष्ट्या महत्वाच्या योजना विहित कार्य पद्धती अवलंबून त्या त्या विभागाकडून राबवून घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत प्रत्येक कुटूंबामागे १५०००/– रू. मर्यादित आर्थिक सहाय्य देण्यात येते या योजनेअंतर्गत वरिल मर्यादेपर्यंतच्यासामुहिक योजनाही घेण्यात येतात. प्रशिक्षण, कल्याणकारी योजना आणि मानवी साधन संपत्तीचा विकास या बाबींवर संपूर्ण अनुदान देता येते.

तथापि उत्पादन निर्मितीच्या योजनेसाठी सर्वसाधारण आदिवासी लाभार्थी, आदिम जमातीचा लाभार्थी आणि दारिद्रय रेषेखालील आदिवासी लाभार्थी यांना अनुक्रमे ८५टक्के, ९५ टक्के व १०० टक्के अनुदान दिले जाते. उर्वरित रक्कम लाभार्थ्याने स्वत:ची वर्गणी म्हणून भरावयाची असते किंवा कर्जाच्या रूपाने मिळवायची असते. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास हे रू. ५ लाखापर्यंतच्या सामुहिक योजना मंजूर करू शकतात. अप्पर आयुक्त आदिवासी विकास ७.५० लाखापर्यंतच्या योजना मंजूर करू शकतात, आयुक्त आदिवासी विकास हे ३०.०० लाखापर्यंतच्या योजना मंजूर करू शकतात व रू. ३०.०० लाखापेक्षा जास्त खर्चाच्या योजना राज्य शासन केन्द्रशासन मंजूर करू शकते.

**आदिवासी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना –**

- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाद्वारे एच.डी.पी.ई. पाईप पुरवठा
- पंचायत समीती कृषी विभागाद्वारे एच.डी.पी.ई. पाईप पुरवठा
- सएकात्मकी आदिवासी विकास प्रकल्पाद्वारे विद्युत पंम्प पुरवठा.
- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ऑईल पम्प पुरवठा
- पंचायत समिती अंतर्गत कृषी विभाग जिल्हा चंद्रपूरच्या विद्यमाने ५०टक्के अनुदानावर ऑईल पम्प पुरवठा योजना.
- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभाग १०० टक्के अनुदानावर लोखंडी नांगर पुरवठा योजना, पेरणीयंत्र, तिफन, डवरा, वखर इत्यादी.
- एकात्मिक पाणलोट विकास विभाग व कृषी विभाग, ५०टक्के अनुदानावर जैवीकरण्यात व किटनाशक औषण, सेंद्रीय खत, पुरवठा योजना, काटेरी तार, ताडपत्री इत्यादी.
- आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत १००टक्के अनुदानावर आधारीत फवारणी यंत्र
- एकात्मकी पाणलोट विकास विभाग व कृषी विभागाद्वारे १००टक्के अनुदान शेततलाव पुरवठा योजना, गटू बिज, चना ब्रिज, मातीकाम, फळ झाडे लागवड, नविन विहिर खोदकाम, विहिर दुरूस्ती, बोरवेल इत्यादी.

अशा प्रकारे विविध योजनांच्या माध्यमाने आदिवासी शेतकऱ्यांसाठी योजना राबविण्यात येत आहेत जणून काही आदिवासी शेतीचा विकास व्हावा व शेतीचे उत्पादन वाढून हयांच्या जिवनमान सुधारणा व्हावी हा उद्देश आहे.

**सारांश –**

या योजनांच्या माध्यमाने आदिवासी शेतीचा विकास व्हावा व उत्पादन वाठावे हा उद्देश ठेवून हया योजनांचा उपक्रम चालविला जातो पण हया सर्व योजनांची माहिती आदिवासी शेतकऱ्याला मिळत नसल्यामुळे योजनांचा लाभ घेता येत नाही व शेतीचा विकास व उत्पादन वाढविण्यात मदत होत नाही.

**संदर्भ ग्रंथ –**


- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर जिल्हा, चंद्रपूर वार्षिक अहवाल.
- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर, जिल्हा, चंद्रपूर वार्षिक अहवाल.
- एकात्मिक पाणलोट विकास विभाग व कृषी विभाग, जि. चंद्रपूर वार्षिक अहवाल.
- पंचायत समिती कृषी विकास विभाग, चंद्रपूर वार्षीक अहवाल.
- आर्थिक सामाजीक समालोचक चंद्रपूर जिल्हा चंद्रपूर महाराष्ट्र राज्य
- भांडे प्रभाकर, भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद.